आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक : 09.11.2026 **वार : सोमवार**

विकास आराखडा

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या, नऊ गावांच्या प्रारूप विकास आराखड्यात एकशे ४३ फेरबदल प्रस्तावित करण्यात आले आहेत.

नागरिकांनी दाखल केलेल्या, सुमारे सात हजार ५९० हरकती आणि सूचनांवर सुनावणी घेतल्यानंतर हे फेरबदल सुचवण्यात आले. त्यापैकी ८४ फेरबदल रस्त्यांशी संबंधित आहेत. लोहगावमध्ये सर्वाधिक ३१ फेरबदल प्रस्तावित आहेत.

हा आराखडा अंतिम मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवला जाणार आहे.

आगीच्या घटना

दिवाळी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी, काल पुणे शहरात आगीच्या ९४ घटनांची नोंद झाल्याच पुणे महापालिकेच्या अग्निशमन विभागानं सांगितलं आहे.

यामध्ये सातारा रस्त्यावर छपाईच्या दुकानाला, मंगळवार पेठेतल्या गोदामासह, तर रेंज हिल्स परिसरात एका सदनिकेचा समावेश असून अग्निशमन दलानं सर्व ठिकाणच्या आगींवर नियंत्रण मिळवलं आहे. अनेक घटना फटाक्यांमुळे घडल्या असून कुठेही मोठी जीवितहानी झालेली नाही. गेल्या वर्षी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी, आगीच्या ४३ घटना नोंदवल्या गेल्या होत्या.

मेट्रो स्थानक

स्वारगेट ते कात्रज भुयारी मेट्रो मार्गावरील, पद्मावती स्थानकासाठी धनकवडी इथली, महापालिकेची सहाशे ६५ चौरस मीटर जागा, महामेट्रोला देण्याच्या प्रस्तावाला शहर सुधारणा समितीनं मान्यता दिली आहे. या जागेच्या मोबदल्यात सुमारे दोन कोटी ३१ लाख रुपये, महापालिकेच्या आर्थिक दायित्वात समायोजित केले जाणार आहेत. हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महापालिकेच्या मुख्य सभेकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

दिवाळी

दिवाळीच्या प्रकाशपर्वतला आजचा दिवस भाकड असल्यानं, काल लक्ष्मी पूजना नंतर बंद करण्यात आलेली बाजारपेठेतली बहुतेक दुकान आज परंपरेनुसार बंद राहीली. उद्या पाडव्याच्या मुहूर्तावर पुन्हा व्यापर सुरू होईल. कार्तिक शुद्ध प्रतिपदा अर्थात विक्रम संवत्सर पाडव्याला बलिप्रतिपदही म्हटलं जातं. विविध मंदिरातून उद्या अन्नकूट-गोवर्धन पूजा करण्यात येते. पती पत्नीच्या नात्यातील गोडवही पाडव्याच्या उपहार भेटीने द्वीगुणीत होतो.

काट्यांची तपासणी

ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर साखर कारखान्यांच्या वजन काट्यांची तपासणी आणि सीलिंग प्रक्रिया वेगाने सुरू असून आतापर्यंत सहकारी आणि खासगी मिळून १६२ साखर कारखान्यांच्या वजन काट्यांची पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी राज्यातील सर्व प्रादेशिक साखर सहसंचालकांना यासंदर्भात सूचना दिलेल्या सूचनांनुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे.

दिवसा वीज

सौर कृषिपंप बसविण्याच्या बाबतीत महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६५ टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २ अंतर्गत वेगाने काम सुरू असून सध्या राज्यातील सुमारे ८० टक्के कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे.

पुढील वर्षी मार्चअखेर राज्यातील १०० टक्के कृषिपंपांना सौरऊर्जेच्या माध्यमातून दिवसा वीजपुरवठा करण्याचे उद्दिष्ट महावितरणने ठेवले आहे.

बॅडमिंटन स्पर्धा

पुण्यात आज झालेल्या राज्यस्तरीय वर्षांखालील बॅडमिंटन स्पर्धेत १७ वर्षांखालील मिश्र दुहेरीत, सयाजी शेलार आणि सोयरा शेलार यांनी दुहेरी मुकुट पटकावला असून दोघांनीही काल प्रत्येकी दोन गटांत विजेतेपद मिळवल.

स्पर्धेच्या एकेरी गटात नागपूरच्या आदित्य यउलने १५ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात रायगडच्या प्रग्नय शिंदेचा पराभव केला. मुलींच्या गटात पुण्याच्या ख्याती कत्रेन पुण्याच्याच कायरा रैनावर मात करून विजेतेपद मिळवले.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात पुण्याच्या अभिग्यान सिंघाने नागपूरच्या आदित्य यउलचा पराभव केला. मुलींच्या गटात रायगडच्या अनुष्का इप्तेने पुण्याच्या शरयू रांजणेचा पराभव करत विजेतेपद पटकावले.

दुहेरी गटात १५ वर्षांखालील मिश्र दुहेरीचे विजेतेपद पुण्याच्या अर्जुन श्रीगडीवार आणि स्वरा मोरये यांनी मिळवले. मुलींच्या दुहेरीत मुंबईच्या इमान मोटरवाला आणि रुद्र गावडे, तर मुलांच्या दुहेरीत पुण्याच्या हृदान पाडवे आणि विहान कोल्हाडे यांनी बाजी मारली.

हवामान

पुणे आणि शहर परिसरात आज आकाश निरभ्र असून किमान तापमान 15 तर कमाल तापमान 33 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. हवामानात उद्याही फारसा बदल नसल्याचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता, आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!